महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
पुणे विभागीय मंडळ, पुणे ४११ ००५

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION,
PUNE DIVISIONAL BOARD, PUNE - 411005

| DIVISIONAL CHAIRMAN | DIVISIONAL SECRETARY | E-MAIL sscboardpune@gmail.com |
| --- | --- | --- |
| 25536722 (OFF) | 25536781 / 82 / 83<br>25536712 (OFF) | |


**महत्त्वाचे-**

जा.क्र.पुविमं/उमा-अ/ ४३३५
पुणे ४११ ००५
दिनांक- १८ /०८/२०२६

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये,
जिल्हा-पुणे, अ.नगर, सोलापूर

**विषय- फेब्रुवारी-मार्च २०२७ इ.१२ वी परीक्षेची आवेदनपत्र भरण्याच्या सूचनांबाबत ...**

उपरोक्त विषयान्वये सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांना कळविण्यात येते की, फेब्रुवारी-मार्च २०२७ उच्च माध्यमिक प्रमाणपत्र इ.१२ वी परीक्षेसाठी नियमित शुल्कासह शुक्रवार, दि.१४.०८.२०२६ ते शनिवार, दि.३१.१०.२०२६ या कालावधीत आवेदनपत्रे भरावयाची आहेत. सदरील आवेदनपत्रे भरताना खालील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

1 विद्यार्थ्यांच्या नावात चुका टाळण्याकरीता प्रिलिस्ट आपल्या कनिष्ठ महाविद्यालय लॉगिन मध्ये आवेदनपत्रे भरावयाच्या कालावधीमध्ये उपलब्ध असेल तेव्हा प्रिंटआउट काढून जनरल रजिस्टनुसार पडताळणी करून खात्री करावी व **खात्री केलेबाबत संबंधित विद्यार्थ्याच्या प्रिलिस्टवरील आपापल्या नावासमोर स्वाक्षरी घ्यावी.** पडताळणी केलेबाबत प्राचार्यांनी प्रिलिस्टच्या प्रत्येक पानावर शिक्क्यासह स्वाक्षरी करावी. तसेच **नाव, जन्मतारखेतील त्रुटी टाळण्याकरीता प्रिलिस्ट/आवेदनपत्र प्रिंटआउट वर विद्यार्थी/पालकांची स्वाक्षरी घ्यावी.** कनिष्ठ महाविद्यालयाने Main login मध्ये अनेक दुय्यम login तयार करून computer lab मध्ये विद्यार्थ्यांमार्फत आवेदनपत्रे भरून मुख्य login द्वारे त्याची तपासणी करावी.

2 **फेब्रुवारी-मार्च** २०२६ च्या परीक्षेपासून गुणपत्रकावर फोटो छपाई करण्याचे प्रथम वर्ष असल्याने महाविद्यालयांकडून झालेल्या त्रुटी विचारात घेऊन सदरील गुणपत्रके पु:नश्च दुरुस्ती करून देण्यात आली होती. मात्र यावर्षी **आवेदनपत्रे मंडळाकडे पाठविल्यानंतर/प्रवेशपत्रे तयार झाल्यानंतर फोटोमध्ये किंवा विषयामध्ये कुठलाही बदल करता येणार नाही, याची कनिष्ठ महाविद्यालयांनी नोंद घ्यावी.** (संदर्भ-राज्य मंडळ पत्र क.रा. मं/परीक्षा-३/३४५५ दि.१३.०८.२०२६) फोटोमध्ये बदल झाल्यास तो जाणीवपूर्वक बदलल्याचे ग्राहय धरून गैरमार्ग समजला जाईल व कनिष्ठ महाविद्यालयावर कारवाई प्रस्तावित करण्यात येईल, याची नोंद घ्यावी. आवेदनपत्रे सादर करताना आपणास विषयांचे कोड याबाबत माहिती नसल्यास राज्य मंडळाच्या वेबसाईट वर विषय या कॉलममध्ये दिलेल्या माहितीचे अवलोकन करावे किंवा मागील वर्षाचे मंडळाचे आपणांस वितरित केलेले छापील

वेळापत्रक पहावे व त्यावरून फॉर्ममध्ये भरावयाचे विषय व विषय कोड यांची खात्री करावी तसेच माध्यमही व्यवस्थित भरावे जेणेकरून आपणाकडून प्रिलिस्ट मध्ये विषय कोडबाबत चुका होणार नाहीत. नियमित विद्यार्थ्यांचे प्रवेशपत्र प्राप्त झाल्यानंतर विषय दुरुस्ती होणार नाही, याची कटाक्षाने नोंद घ्यावी. तसेच परीक्षेच्या ऐनवेळी विषय बदल करून विद्यार्थ्यास परीक्षेस प्रविष्ठ होता येणार नाही व प्रविष्ठ झाल्यास आणि प्रश्नपत्रिका उपलब्ध न झाल्यास त्याला विद्यार्थी व कनिष्ठ महाविद्यालय जबाबदार राहील, याची नोंद घ्यावी.

3 आवेदनपत्रे भरताना केवळ आपल्या महाविद्यालयास **मान्यता असलेल्या विषयांनाच विद्यार्थ्यांना प्रविष्ठ करावे.** मान्यता नसलेल्या विषयांस परस्पर प्रविष्ठ केल्यास आपले महाविद्यालय पुढील कार्यवाहीस जबाबदार राहील. तसेच माध्यम सुध्दा आपणांस मान्यता आहे त्याच माध्यमांतून आवेदनपत्र भरावे.

4 श्रेणीसुधार योजनेचे आवेदनपत्र भरताना काळजीपूर्वक भरावेत विद्यार्थ्यास पहिली नियमित परीक्षा दिल्यानंतर लगतच्या परीक्षेपासून तीन संधी उपलब्ध असतात. श्रेणीसुधार विद्यार्थ्याचा विषय, माध्यम, कनिष्ठ महाविद्यालय, केंद्र बदल करता येणार नाही. मंडळाच्या गतवर्षीच्या परीक्षेदरम्यान असे निदर्शनास आले आहे की, **श्रेणीसुधारचे विद्यार्थी तुरळक विषय घेऊन (आयसोलेटेड) अथवा पुनर्परिक्षार्थी म्हणून आवेदनपत्रे भरतात, अशा विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे मंडळाकडून रद्द करण्यात येतील व संबंधित कनिष्ठ महाविद्यालयावर कारवाई करण्यात येईल,याची नोंद घ्यावी.**

5 **तुरळक विषय घेणा-या(आयसोलेटेड)** विद्यार्थ्यांचे आवेदनपत्रे भरताना त्यांची मागील गुणपत्रिका पाहूनच त्याने यापुर्वी नियमित विद्यार्थी म्हणून परीक्षेस दिलेल्या विषयांव्यतिरिक्त विषय आहे का, याची कनिष्ठ महाविद्यालयाने खात्री करावी. तुरळक विषय घेऊन प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांना कमीत कमी १ व जास्तीत जास्त ४ नवीन विषय घेऊन परीक्षेस प्रविष्ट होता येते. त्यामुळे तुरळक विषय घेऊन प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्याने घेतलेला विषय हा यापुर्वी दिलेला नसावा. तुरळक विषय घेणा-या **विद्यार्थ्याची प्रिलिस्ट जमा करताना सोबत अगोदरची नियमित विद्यार्थी म्हणून परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या गुणपत्रिकेची छायाप्रत जोडणे आवश्यक आहे.**

6 कोणत्याही परिस्थितीत आपणास मंजूर असलेल्या तुकडयांपेक्षा जादाचे विद्यार्थी प्रविष्ठ करून त्यांची आवेदनपत्रे भरू नये , असे आढळल्यास आपले महाविद्यालय कारवाईस पात्र राहील.

7 आवेदनपत्रे भरताना मंडळाच्या विषय योजनेनुसार भरावा. **Wrong Combination ने फॉर्म भरल्यास विद्यार्थ्याचा निकाल रद्द होईल याची नोंद घ्यावी.**

8 खाजगी विद्यार्थ्याचे आवेदनपत्र भरताना आपलया कनिष्ठ महाविद्यालयास ज्या विषयांची/माध्यमांची मान्यता आहे त्यानुसारच आवेदनपत्रे भरावीत. **खाजगी विद्यार्थ्यांना कॉम्प्युटर सायन्स, क्रॉप सायन्स हे विषय घेवून प्रविष्ट होता येणार नाही.**

उपरोक्त सूचनांचे पालन करून इ. १२ वी आवेदनपत्रे विहीत मुदतीत सादर करावीत व दिलेल्या सूचनांचे कटाक्षाने पालन करावे.

MBRaut

(डॉ.मीनाक्षी राऊत)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे- ४११ ००५